महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग,
राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा
मुख्य इमारत, दालन क्र.३०२, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दूरध्वनी क्र. ०२२ २२७९४१२४ Email: mhpmustate@gmail.com, gnd२housing@mah.gov.in

क्रमांकः PMU-२०२४/प्र. क्र. १३९ /गृनिधो-२ दिनांक: ०७ जानेवारी, २०२६

# ई-निविदा सूचना

विषय:- राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU),गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन कार्यालयाकरिता नवीन कार्यालयीन जागा उपलब्ध करून घेणेबाबत.

राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU),गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन कार्यालयाकरिता नवीन कार्यालयीन जागा उपलब्ध करून घेण्याकरिता आवश्यक पात्रता निकष, प्राधान्य निकष व सर्वसाधारण अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत:-

अ) पात्रता निकष -

१) कार्यालयीन जागा दि. ०१/०२/२०२६ पासून वापरात हवी असल्याने, तात्काळ वापरास येऊ शकणारी (Ready to move) आणि ३१/०१/२०२६ पूर्वी ताबा घेता येण्यासारखी असावी.

२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मानकांनुसार किमान २,००० ते ३,००० चौ. फूट क्षेत्रफळाची जागा (फर्निचरसहित) आवश्यक आहे.

३) सदर जागा नरिमन पॉईंट, मुंबई क्षेत्रातील असावी.

४) कार्यालयाच्या आवश्यकतेप्रमाणे बैठक व्यवस्था, दस्तऐवज ठेवण्याकरिता जागा तयार असावी अथवा जागेचा मालक आवश्यकतेप्रमाणे सदर व्यवस्था करून देण्यास तयार असावा.

५) सदर जागेत विद्युत व वातानुकूलन यंत्रणेची व्यवस्था असावी.

६) सदर जागेत पुरुष व स्त्रिया यांचेकरीता स्वतंत्र सुविधांतील स्वच्छतागृहे असावीत.

आ) प्राधान्य निकष -

१) सदर जागा व परिसर सुरक्षित असावा. तसेच संबंधित इमारतीत सुरक्षा रक्षक असावा. बांधकामाच्या भिंती व छत भक्कम सिमेंटचे असावे.

२) कार्यालयातील अधिकारी यांच्या चार चाकी वाहनांकरिता किमान दोन (२) वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था उपलब्ध असावी.
३) भाडेकरू नसलेल्या रिकाम्या जागेस प्राधान्य देण्यात येईल.

**इ) सर्वसाधारण अटी व शर्ती -**

१) जागा मालकासोबत नोंदणीकृत दस्त करण्यात यावा.
२) दस्तास येणारा सर्व खर्च, मुद्रांक, नोंदणी फी आणि अनुषंगिक खर्च याबाबत पक्षकार यांनी करावयाच्या प्रस्तावात स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.
३) निविदादारांकडून त्यांची दरपत्रके दिनांक १५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत मोहरबंद लिफाफ्यात "**उप सचिव तथा मुख्य अधिकारी व अभियान संचालक**,राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU), गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई." यांचे नाव पाठविण्यात यावीत. त्यानंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.
४) दरपत्रकांमध्ये नमूद करण्यात येणारे दर हे करांसहित व कररहित अशा दोन्ही प्रकारे नमूद करण्यात यावेत.
५) मोहरबंद लिफाफ्यावर "कार्यालयीन जागेकरीता दरपत्रक" असे लिहिणे आवश्यक आहे.
६) दरपत्रक फॉर्मवर, दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.
७) प्राप्त दरपत्रके दिनांक १५/०१/२०२६ रोजी **उप सचिव तथा मुख्य अधिकारी व अभियान संचालक**,राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU), गृहनिर्माण विभाग, मुख्य इमारत, दालन क्र.३०३, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२, येथे सायं. ६.३० वाजता उघडण्यात येतील.
८) दरपत्रकांचे मोहरबंद लिफाफे उघडते वेळी दरपत्रकधारक स्वतः किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.
९) निविदा स्वीकार होऊन आदेश निर्गमित केल्यानंतर व करार केल्यानंतर उप सचिव तथा मुख्य अधिकारी व अभियान संचालक,राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU), गृहनिर्माण विभाग यांना तात्काळ स्वीकारलेल्या दरपत्रकानुसार जागा ताब्यात देणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.
१०) जागा ताब्यात दिल्यानंतर दरमहा मुद्रांक पावतीसह देयके सादर करतील. देयकाची रक्कम ECS द्वारे जमा करण्यासाठी बँक खात्याचा सविस्तर तपशील सादर करणे आवश्यक राहील. परिपूर्ण देयके सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. तसेच, प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.
११) कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, निविदा प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा तसेच दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार उप सचिव तथा मुख्य अधिकारी व अभियान संचालक,राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU), गृहनिर्माण विभाग राखून ठेवत आहे.

१२) पुरवठादार संस्था नोंदणीकृत (उद्योग आधारधारक किंवा उद्योग नोंदणी प्रमाणपत्र धारक / RERA नोंदणीधारक) असावा.

१३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४०/विमा प्रशासन दि. १३/०९/२०२२ नुसार सदर जागेचा विमा संबंधित पुरवठादार यांनी उतरविणे बंधनकारक राहील.

१४) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त अन्य आवश्यक अटी शर्ती, करार करतावेळी अंतर्भूत करण्याचा अधिकार विभागाकडे असेल.

१५) उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे निविदा दरपत्रक मध्ये नमूद असेल, तरच निविदादाराच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

ठिकाण :- मुंबई.